# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## राज्याच्या पुरातत्व विभाग आणि वस्तू संग्रहालय संचालनालयातील अनेक पदे रिक्त असल्याबाबत

**(१) ४०३२७ (१२-०४-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राचीन मंदिरे, किल्ले, लेणी, वस्तुसंग्रहालय अश्या वारसावस्तूंच्या संवर्धनाची जबाबदारी पुरातत्व विभागाकडे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या पुरातत्व विभाग आणि वस्तू संग्रहालय संचालनालय मधील अनेक पदे मागील काही काळापासून रिक्त आहेत ,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अश्या वारसावस्तूंच्या संवर्धनासाठी शासनाकडून किरकोळ निधी दिला जातो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,पूरातत्व विभागातील रिक्त पदे भरण्यासह वारसावस्तूच्या संवर्धनासाठी पूरेसा निधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०२-२०२३) :** (१) राज्यातील राज्य संरक्षित स्मारके, गड किल्ले, लेणी, मंदिरे इत्यादी ३८६ वास्तूंचा व १३ वस्तूसंग्रहालयाच्या जतन व संवर्धन पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयामार्फत करण्यात येते.

(२) हे खरे आहे.

पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयातील एकूण ३०० मंजूर पदापैकी १४१ पदे रिक्त आहेत.

(३) हे खरे नाही.

वारसा वास्तूंच्या संवर्धनासाठी आर्थिक वर्ष २०१९-२० ते २०२१-२२ या ३ वर्षाच्या कालावधीत सरासरी प्रतिवर्ष रु.४३.७९ कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. त्यापैकी सरासरी रु.३०.५० कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे व सरासरी रु.२९.१७ कोटी इतका निधी खर्च झाला आहे.

(४) वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ३१.१०.२०२२ नुसार रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच, राज्य संरक्षित स्मारकांच्या जतन व संवर्धनासाठी आवश्यक त्या निधीची मागणी करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लांजा व राजापूर (जि.रत्नागिरी) येथील अनेक पदे रिक्त असल्याबाबत

**(२) ४०५३५ (०१-०४-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर व लांजा (जि.रत्नागिरी) येथील तहसिलदार कार्यालयात मोठया प्रमाणात अनेक पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त लांजा कार्यालयात अव्वल कारकून,लिपीक,तलाठी कोतवाल, शिपाई, अशी एकूण २८ पदे रिक्त आहेत तर राजापूर कार्यालयात नायब तहसिलदार, अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, लिपीक टंकलेखक, तलाठी, शिपाई, पहारेकरी, स्वच्छक, कोतवाल अशी एकूण ३४ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्यस्थितीमध्ये राजापूर तालुक्यात २३७ व लांजा तालुक्यात १२४ अशी ३६१ महसूल गावे असतांना रिक्त पदांमुळे ग्रामस्थांना कागदपत्रे वेळीच प्राप्त होत नसल्यामुळे वारंवार कार्यालयात फेऱ्या माराव्या लागतात हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी महसूल, राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक २ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार करुन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू रिक्त असलेल्या पदांमुळे इतर कर्मचा-यांवर कामाचा ताण पडला असुन ग्रामस्थांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त तालुक्यातील रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे. तहसिलदार कार्यालय, लांजा येथे गट-अ, गट-ब, गट-क व गट-ड संवर्गातील एकूण २८ पदे तर तहसिलदार कार्यालय राजापूर येथे एकूण ४५ पदे रिक्त आहेत.
(३) हे खरे नाही. रिक्त पदांमूळे कर्मचा-यांवर अतिरिक्त ताण पडत असला तरी कार्यरत कर्मचा-याकडून दैंनंदीन प्रशासकीय कामकाजाचे योग्य प्रकारे नियोजन करण्यात येत आहे. तसेच ग्रामस्थांना वेळेत काम पूर्ण करुन देणेबाबत दक्षता घेण्यात येत आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) हे खरे नाही. रिक्त पदांमूळे कर्मचा-यांवर अतिरिक्त ताण पडत असला तरी ग्रामस्थांना कोणतीही अडचण येणार नाही, याची खबरदारी घेण्यात येत आहे.
(६) महसूल विभागाच्या सुधारित आकृतींबधास वित्त विभागाची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे. आकृतीबंध निश्चित झाल्यानंतर सदरची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी (जि. ठाणे) उपविभागात शासनाच्या विविध प्रकल्पाकरीता संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत

**(३) ४०५४७ (११-०४-२०२२). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि. ठाणे) उपविभागात सुरु असलेल्या केंद्र तसेच राज्य सरकारच्या विविध प्रकल्पांकरीता संपादित केलेल्या जमिनीचा खातेदाराना मोबदला वितरीत करताना टक्केवारीची मागणी करण्याबाबत भिवंडी व शहापुर तालुक्यातील शेतकऱ्याकडुन श्री.नळदकर, तत्कालीन प्रांताधिकारी, भिवंडी यांच्या विरोधात तक्रारी झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या विविध प्रकल्पाकरीता संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला खातेदाराना वितरीत केलेल्या रक्कमेची माहिती मिळण्यासाठी दिनांक २४ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्र दिले होते. परंतु सद्यस्थितीतील प्रांताधिकरी भिवंडी श्री.वाघचौरे यांनी सदरील माहिती दोन महिन्याचा कालावधी लोटल्यानंतर दिनांक २९ ऑक्टोबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास अपुर्ण व चुकीची माहिती दिली, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, सन २०१९ -२० या आर्थिक वर्षामध्ये उ.वि.अ. भिवंडी याच्या कार्यालयात संगणक व प्रिंटर खरेदी करण्यात आले असून सदर संगणक व प्रिंटर प्रथम मंजुर निविदापेक्षा अधिक व वाढीव दराने खरेदी करण्यात आले आहे ही माहिती दिनांक २४ ऑगस्ट,२०२१ रोजी वा त्यासुमारास पत्रात कळविले होते. परंतु सद्यस्थितीतील प्रांताधिकरी भिवंडी, श्री.वाघचौरे यांनी सदरील माहिती दोन महिन्याचा कालावधी लोटल्यानंतर दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास अपुर्ण व चुकीची माहिती दिली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१२-२०२२) :** (१) हे, खरे नाही.
(२) हे, खरे नाही.
(३) हे, खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पशुसवंर्धन विभागातील पशुधन पर्यवेक्षक व सहायक पशुधन विकास अधिकारी सवंर्गातील कर्मचाऱ्यांच्या मागण्या प्रलंबित असल्याबाबत**

**(४) ४११५८ (०१-०४-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पशुसवंर्धन विभागातील पशुधन पर्यवेक्षक व सहायक पशुधन विकास अधिकारी सवंर्गातील कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कर्मचा-यांसह सहायक आयुक्त पशुसवंर्धन, पशुधन विकास अधिकारी गट -अ सेवाप्रवेश नियम सुधारण्याबाबत तसेच अन्य मागण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,.
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०२-२०२३) :**(१), (२) व (३)
पशुसंवर्धन विभागातील कर्मचाऱ्यांच्या सेवाप्रवेश नियमात सुधारणा करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

---

**राज्यातील अवनत जमिनीवर वृक्ष लागवड करण्याबाबत**

**(५) ४२४११ (१८-०४-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ज्याठिकाणी पूर्वी वने होती, परंतु काही कारणामुळे त्यांचा ऱ्हास झाला अशा अवनत वनजमिनीवर मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा वनीकरण करण्यासाठी खासगी व अशासकीय संस्थांचा सहभाग घेऊन ६५ एकर अवनत वनक्षेत्रावर ७१ हजार ६६५ वृक्ष लागवडीचे त्रिपक्षीय करार करण्यात आला असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वृक्ष लागवडीसाठी जमीन देण्यासाठी विभागवार जागेची निश्चिती करण्यात यावे, असे निदेश वन विभागाला दिले आहे, तसेच केवळ वृक्ष लागवड करुन त्यांचे जतन आणि संवर्धन करण्याचे काम ठाणे जिल्हयातील तीन कंपन्यांना सात वर्षासाठी देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-०२-२०२३) :** (१) अशासकीय संस्था, खाजगी संस्था आणि वन विभाग यांच्यात त्रिपक्षीय करारनामा करून ठाणे वनवृत्तातील ६५ हे. अवनत वनक्षेत्रावर वनजमिनीवर वृक्षारोपण करून केवळ जतन आणि संवर्धन करण्यास मा.मुख्यमंत्री / मा. मंत्री (वने) यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या दिनांक १८.१०.२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता दिली आहे. सदर वृक्षारोपण करण्यासाठी आवश्यक खर्च खाजगी संस्थांमार्फत करण्यात येणार आहे तर वृक्षारोपणाचे काम वन विभागाच्या देखरेखीखाली अशासकीय संस्थांमार्फत

करण्यात येणार आहे.
(२) उच्चाधिकार समितीच्या दिनांक १८.१०.२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये त्यावेळेस शासनास प्राप्त झालेल्या ठाणे वनवृत्तातील ३ प्रस्तावांना मान्यता दिली आहे. तसेच, यापूर्वी राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये देखील त्रिपक्षीय करारनामा करून वृक्षारोपण करण्यास वेळोवेळी मान्यता देण्यात आली आहे.
(३) राष्ट्रीय वन निती, १९८८ नूसार भौगोलिक क्षेत्राच्या ३३% क्षेत्रावर वनाच्छादन करण्याचे उद्दिष्ठ ठेवण्यात आली आहे. सदर उद्दिष्ठ गाठण्यासाठी शासन सतत प्रयत्नशील आहे. त्रिपक्षीय करारनामा करून अवनत जमिनीवरील वृक्षाच्छादन वाढवण्यासाठी शासनाने वेळोवेळी मान्यता दिली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यात प्रकल्पबाधित आदिवासी शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत

**(६) ४२५३२ (०७-०४-२०२२). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी विविध प्रकल्पांसाठी अधिग्रहण करण्याचे काम सुरु असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पालघर जिल्ह्यात बुलेट ट्रेन, मुंबई बडोदा हायवे आणि इतर मोठ्या प्रकल्पाची कामे आगामी काळात सुरु होणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी प्रकल्पासाठी संपादित करण्यात येतात त्यांना देण्यात येणाऱ्या मोबदल्याचे थोड्यात स्वरूप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२८-१२-२०२२) :** (१) व (२) होय,
पालघर जिल्हयात बुलेट ट्रेन, मुंबई-वडोदरा हायवे आणि इतर मोठया प्रकल्पांसाठी भूसंपादनाची कामे सुरु आहेत.
(३) व (४) उपरोक्त प्रकल्पातील संपादित होणाऱ्या जमिनीचा मोबदला भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील तरतूदींनुसार मोबदला निश्चित करुन त्यानुसार आदिवासी व बिगर आदिवासी यांना मोबदला वाटप करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यात पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची अनेक पदे रिक्त असल्याबाबत

**(७) ४३९१९ (०७-०४-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील पशुवैद्यकीय अधिका-यांची अनेक पदे रिक्त असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पशुवैद्यकीय रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०२-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) संवर्गाची ५६ रिक्त पदे आणि पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गाची २९८ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून, लोकसेवा आयोगाद्वारे उमेदवारांची निवड होवून विभागास शिफारस प्राप्त झाल्यानंतर त्याद्वारे सदरहू रिक्त पदे भरण्याचे

संकल्पित आहे. राज्यात उद्भवलेल्या लम्पी चर्मरोग प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर अत्यावश्यक बाब म्हणून पशुधन पर्यवेक्षकांची ११५९ पदे (राज्यस्तर २८६ व जिल्हा परिषदस्तर ८७३) आणि पशुधन विकास अधिकाऱ्यांची २९३ पदे बाह्य स्त्रोतांद्वारे तात्पुरत्या स्वरुपात भरण्यास शासन निर्णय दिनांक १६/०९/२०२२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये पदभरतीवरील निर्बंध शिथील करण्यात आल्यामुळे नवीन पदभरतीद्वारे गट-क संवर्गातील रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्र आणि राज्य शासनाच्यावतीने कृषी खातेअंतर्गत**
**विविध योजनांसाठी खर्चाचे निकष वाढविण्याबाबत**

**(८) ४४५७५ (२९-०१-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र व राज्य शासनाच्यावतीने कृषी खातेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांसाठी खर्चाचे निकष आर्थिक वर्ष २०१४-२०१५ या कालावधीमध्ये ठरविण्यात आले, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, त्यानंतर सन २०२२ पर्यंत खर्चाच्या निकषात वाढ करण्यात आली नसून कृषी विभागाच्या योजनांची गती मंदावल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी आर्थिक निकषाच्या खर्चात किमान ४० टक्क्यापर्यंत वाढ करुन शेतकऱ्यांना दिलासा देण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (१६-०२-२०२३) :** (१) केंद्र शासनाच्या योजनांबाबत हे खरे आहे. सन २०१४-१५ पासून केंद्र शासनाने केंद्र पुरस्कृत योजनांची पुनर्रचना केली असून काही योजना एकत्रित करुन अभियान स्वरुपात राबविण्याचे निश्चित केले आहे.
(२) हे खरे नाही. प्रशासकीय विभागाद्वारे हाताळण्यात येणाऱ्या योजनांचा आढावा घेवून कालबाह्य योजना/योजनांमधील घटक वगळून तसेच योजना/घटकांचे एकत्रिकरण करुन तसेच उद्दिष्टांमध्ये वाढ करुन परिणामकारकता वाढविण्याच्या अनुषंगाने तदनंतरच्या कालावधीत देखील बदल केले आहेत. केंद्र पुरस्कृत योजनांच्या धर्तीवर राज्य पुरस्कृत योजनांची देखील पुनर्रचना सन २०१७-१८ मध्ये केली आहे.
(३) कृषि विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या योजनांतर्गत वैयक्तिक लाभाच्या घटकांसाठीच्या अनुदानात वाढ करुन शेतकऱ्यांना दिलासा देणे तसेच योजनांची परिणामकारकता वाढविण्यात आली आहे. अल्प व अत्यल्प भूधारक आणि महिला शेतकऱ्यांना तुलनेत वाढीव अनुदान देय आहे. सूक्ष्म सिंचन संच उभारणी, सिंचन सुविधा निर्मिती, कृषि यांत्रिकीकरण इ. मोठ्या भांडवली गुंतवणूकीच्या बाबींसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक तसेच महिला शेतकरी यांनी अतिरिक्त अर्थसहाय्य देण्यासाठी स्वतंत्र राज्य योजना राबविल्या जात आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे येथील दुग्धव्यवसाय व पशुवैद्यकीय सेवा संबंधित पशुपालकांच्या मागण्या प्रलंबित असल्याबाबत**

**(९) ४४६५४ (०६-१०-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे येथे दुग्धव्यवसाय व पशुवैद्यकीय सेवा संबंधित पशुपालकांच्या अनेक मागण्या प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत १८ वर्षात शासनाने पशुधन पर्यवेक्षकांचे एकही रिक्त पद भरण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०२-२०२३) :** (१), (२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) संवर्गाची ५६ रिक्त पदे आणि पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गाची २९८ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून, लोकसेवा आयोगाद्वारे उमेदवारांची निवड होवून विभागास शिफारस प्राप्त झाल्यानंतर त्याद्वारे सदरहू रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे. राज्यात उद्भवलेल्या लम्पी चर्मरोग प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर अत्यावश्यक बाब म्हणून पशुधन पर्यवेक्षकांची ११५९ पदे (राज्यस्तर २८६ व जिल्हा परिषदस्तर ८७३) आणि पशुधन विकास अधिकाऱ्यांची २९३ पदे बाह्य स्त्रोतांद्वारे तात्पुरत्या स्वरुपात भरण्यास शासन निर्णय दि. १६/०९/२०२२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये पदभरतीवरील निर्बंध शिथील करण्यात आल्यामुळे नवीन पदभरतीद्वारे गट-क संवर्गातील रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे.

---

## मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील (मुंबै बँक) आर्थिक गैरव्यवहाराप्रकरणी सहकार खात्याचे विशेष लेखा परिक्षक यांच्या तक्रारीबाबत

**(१०) ४४८४८ (२०-०९-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील (मुंबै बँक) आर्थिक गैरव्यवहाराप्रकरणी सहकार विभागाच्या विशेष लेखा परिक्षक यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीसांकडून चौकशी सुरु करण्यात आली आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी आर्थिक गैरव्यवहाराबाबतच्या विविध तक्रारी आर्थिक गुन्हे विभागानेही रमाबाई मार्ग पोलीसांकडे वर्ग केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, तसेच तक्रारीच्या अनुषंगाने आर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०६-०२-२०२३) :** (१) व (२) होय.
(३) होय, या प्रकरणी अद्याप चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे पाबळ (ता.शिरुर, जि.पुणे ) येथील वडिलोपार्जित जमिनीच्या हस्तांतरणाबाबत

**(११) ४४९०९ (०७-११-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पाबळ (ता.शिरुर, जि.पुणे ) येथील जमिन गट क्र. ११४४ (जुना सर्वे नं ६९) व गट क्र. ३७०६ (जुना सर्वे नं. २४९) या जमिनीचे अर्जदार श्री.बाळासाहेब रामभाऊ वाघोळे यांनी सदरील वडिलोपार्जित जमिनीच्या हस्तांतरणाबाबत दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा. महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन सादर केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वडिलोपार्जित जमिनीच्या हस्तांतरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०९-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अर्जदार यांच्या निवेदनातील विनंतीच्या अनुषंगाने महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम,१९४८ कलम ७०-ब मधील तरतुदीनुसार विषयांकित जमिनीचे कुळ ठरविण्यासंदर्भातील अर्धन्यायिक कामकाज तहसिलदार, शिरुर यांच्यामार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डॉ. पंजाबराव देशमुख विद्यापीठांतर्गत घेतलेल्या कृषी सहाय्यक पदाच्या भरतीत उत्तरपत्रिका कोऱ्या असल्याबाबत

**(१२) ४५१०७ (०४-११-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाअंतर्गत घेतलेल्या कृषी सहाय्यक पदाच्या भरतीत परीक्षार्थींनी उत्तरपत्रिका कोऱ्या ठेवल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, विद्यापीठाकडून केलेल्या चौकशीत आढळून आलेल्या दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे ,

(३) तसेच, १०० टक्के पदे भरणे शासनाचे धोरण असले तरी कृषी विभागात एकूण किती रिक्त पदे आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अब्दुल सत्तार (१४-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) वित्त विभागाच्या शासन निर्णय दि.३१.१०.२०२२

अन्वये पद भरतीवरील निर्बंध शिथील करण्यात आले असून त्यानुसार ज्या विभाग /कार्यालयांचा सुधारित आकृतीबंध अंतिम झालेला आहे, अशा विभाग/कार्यालयांतील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे १००% भरण्यास मुभा देण्यात आली आहे.

तसेच ज्या विभाग /कार्यालयांचा सुधारित आकृतीबंध अद्याप अंतिम झालेला नाही, अशा विभाग / कार्यालयांतील गट-अ,गट-ब व गट-क मधील (वाहनचालक व गट-ड संवर्गातील पदे वगळून ) सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदांच्या ८०% पदे भरण्यास सहमती देण्यात आली असून त्यानुसार रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

सदयस्थितीत राज्यातील कृषि विद्यापीठांसह कृषि विभागातील एकूण ३९,९५२ पदांपैकी १५,६५४ पदे ही रिक्त आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कृषी विभागाच्या केंद्र व राज्य सरकारतर्फे राबविल्या जाणाऱ्या अनेक योजनांसाठी मंजूर निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(१३) ४५२३९ (०३-११-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्य सरकारच्या वतीने राबविल्या जाणाऱ्या राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, व्यापारी पीक सदन, कापूस विकास कार्यक्रम व इतर योजनांसाठी मागील आर्थिक वर्षात १२ कोटी २३ लाख इतक्या मंजूर निधीपैकी १० कोटी २९ लाख इतका निधी प्राप्त होऊन २ कोटी १९ लाख रुपये इतका निधी अखर्चित राहिला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील दोन वर्षांपासून केंद्र सरकार व राज्यसरकार यांच्यामार्फत कृषी विभागात कोणकोणत्या योजनांसाठी किती निधी उपलब्ध झाला,

(३) असल्यास, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांच्या उदासीनतेमुळे शेतकऱ्यांच्या हितासाठी असलेल्या योजना अपूर्ण राहून निधी परत करावा लागला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (१६-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यामार्फत कृषि विभागाच्या ४१ योजनांसाठी सन २०२०-२१ या वर्षासाठी रु.४३८१.५९ कोटी आणि सन २०२१-२२ या वर्षासाठी रु.५६६२.२८ कोटी प्राप्त झाले आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) व (५)प्रश्न उद्भवत नाही.

---

**आरे वसाहतीमधील शासकीय रूग्णालय बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत**

**(१४) ४५५४३ (१४-१२-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आरे वसाहत हे वनक्षेत्र असून तेथे २७ आदिवासी पाडे, ४६ ठिकाणी झोपडपट्टया, रॉयल पाल्म, आदर्श नगर, मयूर नगर इ. वसाहती असून तेथे आरे प्रशासनाकडून शासकीय रूग्णालय सुरू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शासकीय रूग्णालयाकडे आरे प्रशासनाचे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने येथे प्राथमिक उपचारार्थ येणाऱ्या या परिसरातील नागरिकांना औषधांचा तुटवटा व कालबाहय झालेली सर्पदंशावरील लस, वैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता यामुळे कोणतेही वैद्यकीय उपचार मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, येथील नागरिकांना वैद्यकीय उपचारार्थ पश्चिम द्रुतगती महामार्गावरील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रामा केअर रूग्णालयात यावे लागत असल्याने जंगली श्वापदांनी अचानक हल्ला केल्यास, आपत्कालीन परिस्थितीत अथवा रात्रीचे वेळी वाहतुकीच्या साधनाअभावी येथील नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून प्रसंगी त्यांच्या जिवितास धोका निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पुरेशा निधी अभावी आरे येथील शासकीय रूग्णालयाची होत असलेली दुरवस्था व येथील स्थानिक नागरिकांना वैद्यकीय उपचाराची असलेली निकड लक्षात घेता सदरहू शासकीय रूग्णालय बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने या प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०२-०२-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) आरे दुग्धवसाहतीत प्रथमोपचार व बाह्यरुग्ण सेवा देण्यासाठी रुग्णालय कार्यरत असून, रुग्णालयाव्दारे क्षयरोग, कुष्ठरोग, हिवताप नियंत्रण, गरोदर माता तपासणी, स्तनदा माता तपासणी इत्यादी सेवा देण्यात येतात. सदर रुग्णालयात केल्या जाणाऱ्या उपचारानुसार औषधाचा तुटवडा असल्याचे अथवा कालबाह्य औषध ठेवण्यात येत असल्याची वस्तुस्थिती नाही.
(४) व (५) होय,

आरे दुग्ध वसाहत, गोरेगाव मुंबई येथील आरे रुग्णालय बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यासाठी शासन निर्णय दिनांक १५/२/२०१६ अन्वये इमारत/जागा महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तथापि, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक २६/५/२०१७ च्या पत्रान्वये आरे रुग्णालय ताब्यात घेण्यास असमर्थता दर्शविली आहे.

---

**तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या. तेरणा नगर, तेर गळीत हंगाम २०२२ या कालावधीत बैठक बोलविण्याबाबत**

**(१५) ४५७०५ (१०-११-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यामधील तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्यादित येथील ऊसाचे भाव तसेच अन्य कायदेशीर व तांत्रिक प्रक्रियेसंदर्भात बैठक घेण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ मे,२०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे शासनाकडे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) तसेच जिल्हा बँकेने सदरहू साखर कारखाना पंचवीस वर्षाच्या मुदतीसाठी भाडेतत्त्वावर देण्यासंदर्भात निविदा काढली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यत बँकेकडे किती निविदा प्राप्त झाल्या तसेच निविदेच्या अटी व शर्ती पूर्ण करुन किती निविदा मंजूर झाल्या व त्याअनुषंगाने निविदाधारकांनी कारखाना सुरु केला आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१४-१२-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना भाडेतत्त्वावर देणेची प्रक्रिया राबविण्यांत आली होती. परंतु शासकीय देणी, एम. एस. ई. बी. देणी व इतर देणी मोठया प्रमाणात असल्याने साखर कारखाना भाडेतत्त्वावर घेणेसाठी फारसा प्रतिसाद मिळाला नाही. सहा वेळेस निविदा प्रक्रिया बँकेने राबविली होती. सहाव्या वेळेस एकमेव भैरवनाथ शुगर वर्क्स लि. सोनारी यांनी वेळेत परिपूर्ण निविदा दाखल केल्याने उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सदर कारखाना २५ वर्ष मुदतीने भाडेतत्त्वावर चालविणेसाठी देवून दिनांक ०६/१२/२०२१ रोजी त्रिपक्षीय करार केला आहे. याबाबत ट्वेंटीवन शुगर लि. लातूर यांनी डी. आर. टी. औरंगाबाद येथे दावा दाखल केला असता डी. आर. टी. औरंगाबाद न्यायालयाने दिनांक १७/०६/२०२२ रोजीच्या निकालपत्राद्वारे बँकेने कारखाना भाडेतत्त्वावर देणेबाबत केलेली कार्यवाही योग्य असल्याचे म्हटले आहे. याबाबत ट्वेंटीवन शुगर लि. लातूर यांनी डी. आर. ए. टी. मुंबई यांच्याकडे अपील दाखल केले असून न्यायालयाने या प्रकरणी "जैसे थे" आदेश दिला आहे. सदर प्रकरणी सुनावणीची कार्यवाही पूर्ण झाली असून अंतिम निर्णय प्रलंबित आहे.

(४) सदरहु कारखाना उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सरफेसी कायदा, २००२ अन्वये ताब्यात घेऊन थकित कर्ज वसुलीसाठी पुढील कार्यवाही केली असल्याने शासन स्तरावर चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोर (जि.पुणे) तालुक्यातील वृध्द साहित्यिक व कलाकार यांना मानधन मिळण्याबाबत**

**(१६) ४५९३६ (०९-१०-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील वृध्द् साहित्यिक व कलाकार यांना मानधन मिळण्याबाबतचा प्रस्ताव रितसर पुणे जिल्हा निवड समितीकडे पाठविला असून शासनाने प्रतिवर्षी जे उद्दिष्ट दिले आहे ते अत्यंत अल्प असल्याने अनेक प्रकरणे प्रलंबित असून या कारणास्तव निवड समितीला पात्र प्रस्तावही मंजूर करता येणे अशक्य असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०१-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे, तथापि, दिनांक ९ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील मान्यवर वृध्द साहित्यिक व कलावंत मानधन योजनेअंतर्गत प्रतिवर्षी प्रत्येक जिल्ह्यातील सन्मानार्थी निवड इष्टांक ६० वरुन १०० असा वाढविण्यात आला आहे. सद्य:स्थितीत या वाढीव इष्टांक मर्यादेतच सन्मानार्थींची निवड करणे अपेक्षित आहे.
(२) पुणे जिल्ह्यातील जिल्हा निवड समितीने सन २०२१-२२ मधील वाढीव इष्टांकानुसार १०० पात्र ठरविलेल्या कलाकारांच्या बँक खात्यात मानधन जमा करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-कसारा अटगाव दरम्यान असलेल्या पुणधे येथील इतिहासकालीन लेण्यांचे जतन करण्याबाबत**

**(१७) ४६१७४ (१७-०९-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-कसारा दरम्यान आटगांवपासून केवळ दोन किमीच्या अंतरावर पुणधे येथील इतिहासकालीन १२ व्या शतकातील लेण्या पुरातत्व विभागाच्या दुर्लक्षामुळे नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याचे दिनांक १८ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने या लेण्यांचे संवर्धन व जतन करण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे,
प्रश्नाधीन लेणी ही लेणी नसून मंदिर आहे व सदर मंदिर राज्य संरक्षित स्मारक नाही. मात्र या मंदिराची दुरावस्था झाल्याबाबत स्थानिक वृत्तपत्रात वारंवार वृत्त प्रकाशित झाले आहे.
(२) संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांच्या अहवालानुसार सदर मंदिर राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याच्या निकषात बसत असून त्याबाबत संचालनालयाकडून योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाने पिकविम्याचा हप्ता न भरल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नसल्याबाबत**

**(१८) ४६५१० (१४-१२-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने खरीप हंगाम सन २०२० या कालावधीमधील पिकविम्याचा हप्ता न भरल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नसल्याचे माहे एप्रिल २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने २४३८ पैकी १४९५ कोटीचा हप्ता भरला असून उर्वरीत ९४३ कोटीचा पिकविम्याचा हप्ता न भरल्यामुळे ३.२० लाख शेतकऱ्यांना २२३.३५ कोटींच्या नुकसान भरपाईपासून वंचित रहावे लागले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास पीक विम्याचा हप्ता न भरण्याची कारणे कोणती आहेत तसेच भरपाई पासुन वंचित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत विमा कंपन्या व केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०८-०२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.

(३) खरीप २०२० हंगामात पिक विमा योजनेमध्ये सहभागी शेतकरी हे कोविड-१९ ची लाक्षणिक स्थिती, त्याच बरोबर शेतकऱ्यांकडे स्मार्ट फोन नसणे, इंटरनेट कनेक्टिव्हिटीच्या समस्या, टोल फ्री क्रमांक न लागणे, पिक विमा ॲप वर सूचना न देता येणे. शासकीय तसेच विमा कंपनीची कार्यालय पूर्ण क्षमतेने चालू नसणे. प्रवास विषयक शासनाच्या निर्बंध अशा विविध कारणांमुळे शेतकरी नुकसान होऊनही विमा कंपन्यांना सूचना देऊ शकले नाहीत. यामुळे नुकसान होऊनही अनेक पात्र शेतकरी नुकसान भरपाई पासून वंचित राहीले आहेत. त्या अनुषंगाने NDRF चे पंचनामे गृहीत धरुन नुकसान भरपाई अदा करणेबाबत राज्य शासनाने निर्देश दिले. तथापि, सदर निर्देशांनुसार नुकसान भरपाई अदा न करण्याची भूमिका विमा कंपन्यांनी स्वीकारल्यामुळे दिनांक १७.१२.२०२२ रोजी झालेल्या राज्यस्तरीय समन्वय समितीच्या बैठकीत जोपर्यंत विमा कंपन्या राज्य शासनाच्या भूमिकेनुसार विमा नुकसान भरपाई अदा करणार नाहीत तोपर्यंत खरीप २०२० साठीचा उर्वरित विमा हप्ता विमा कंपन्यांना अदा करण्यात येवू नये असे निर्देश प्राप्त झाल्यामुळे पुढील विमा हप्ता विमा कंपन्यांना अदा करण्यात आला नाही.

राज्य शासनाच्या भूमिकेनुसार नुकसान भरपाई अदा करणेबाबत सर्व विमा कंपन्यांना आदेशित करणेबाबत केंद्र शासनास दिनांक १३.०७.२०२१ व दिनांक ०८.१०.२०२१ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच दिनांक १७.१२.२०२१ रोजी मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या राज्यस्तरीय बैठकीत विमा कंपन्यांना राज्य शासनाच्या भुमिकेनुसार शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती अंतर्गत पंचनामे गृहित धरून नुकसान भरपाई अदा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सदर योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यात येत असल्याने याअनुषंगाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंतप्रधान पिक विमा योजनेचा शेतकऱ्यांना फायदा मिळण्याऐवजी**
**विमा कंपनीलाच फायदा होत असल्याबाबत**

**(१९) ४६५३७ (१४-१२-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुरू असलेली प्रधानमंत्री पिक विमा योजना केवळ विमा कंपन्यांच्या फायद्याची असल्याचा आक्षेप असल्याने, राज्य सरकारने यावर्षी सन २०२२-२०२३ या कालावधीत कृषी विम्यासाठी बीड पॅटर्न राबविण्याचा विचार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यभरातील गत चार वर्षांपासूनची आकडेवारी बघता शेतकरी केंद्र व राज्य सरकार यांनी भरलेला हप्ता व देण्यात आलेली नुकसान भरपाई बघता यात पीक विमा कंपनीचाच फायदा झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियोजित पिकविमा योजनेसाठी शासनाकडून खुल्या पर्यायी निविदा मागविल्या गेल्या, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकरी, केंद्र व राज्य शासनाने भरलेल्या हप्त्याच्या रकमेपेक्षा पिकांच्या नुकसान भरपाईपोटी भरलेल्या हप्त्यापेक्षा जास्त रक्कम द्यावयाची असल्यास ती रक्कम पीक विमा कंपनी भरते की शासन भरते, सदरहु पिक विमा योजनेचे स्वरूप काय आहे, तसेच राज्यात खरीप हंगाम सुरू झाला असतानाही शासनाकडून पिक विमा योजनेबाबत शेतक-यांमधे निर्माण झालेल्या संभ्रमाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०८-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) खरीप २०२२ व रब्बी २०२२-२३ हंगामासाठी राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना Cup & Cap Model (८०:११०) नुसार अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी विमा क्षेत्र घटक (Area Approach) धरुन राबविण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत विमा कंपन्या एका वर्षामध्ये जिल्हा समुहामध्ये एकूण जमा विमा हप्ता रक्कमेच्या ११० टक्के पर्यंतचे दायित्व स्वीकारतील. तथापि, एका वर्षातील देय पिक विमा नुकसान भरपाईची रक्कम, जमा विमा हप्ता रक्कमेच्या ११० टक्के पेक्षा जास्त असल्यास ११० टक्के पेक्षा जास्तीचा भार राज्य शासन स्विकारेल आणि जर देय पिक विमा नुकसान भरपाईची रक्कम जिल्हा समुहामध्ये एकूण जमा विमा हप्ता रकमेपेक्षा कमी असेल तर विमा कंपनी विमा हप्ता रक्कमेच्या जास्तीत जास्त २० टक्के रक्कम स्वत:कडे ठेवेल व उर्वरीत विमा हप्ता रक्कम राज्यशासनाला परत करेल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पशुचिकित्सा व्यवसाय संघटना यांनी पर्यवेक्षक व सहाय्यक पशुधन विकास अधिकारी संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत

**(२०) ४६५४३ (२७-१०-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पशुचिकित्सा व्यवसाय संघटना यांनी पशुधन पर्यवेक्षक व सहाय्यक पशुधन विकास अधिकारी संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांकरीता शासनाकडे वारंवार विनंती केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त संघटनेने आंदोलने, पत्रव्यवहार करूनही अद्याप त्यांच्या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पशुधन पर्यवेक्षक व सहाय्यक पशुधन विकास अधिकारी संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (धामनगाव रेल्वे) यांनी संबंधीत मंत्र्यांना निवेदन देऊन मागणी केली , हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०२-०२-२०२३) :** (१), (२), (३) व ४) अंशत: खरे आहे,
पशुधन पर्यवेक्षक व सहाय्यक पशुधन विकास अधिकारी संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत मा. उपाध्यक्ष, विधानसभा यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०३/०८/२०२१ रोजी बैठक संपन्न झाली होती. तसेच सदर बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने आढावा बैठक मा. मंत्री (पशुसंवर्धन) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९/०३/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिखली (जि. बुलढाणा) तालुक्यामध्ये मृत पशु उपयोगिता केंद्र सुरू करण्याबाबत

**(२१) ४६५७६ (२८-१०-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :**सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखली (जि. बुलढाणा) तालुक्यामध्ये मृत पशु उपयोगिता केंद्र सुरू करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २१ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास पशुसंवर्धन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी स्वरूपात केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियानाच्या पशुधन विकास या उप-अभियानांतर्गत मृत पशु उपयोगिता केंद्राची स्थापना ही योजना पंचायतराज स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत कार्यरत असताना केंद्र शासनाकडून माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निर्गमित करण्यात आलेल्या राष्ट्रीय पशुधन अभियानाच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांमध्ये या योजनेचा समावेश करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वातावरणातील प्रदुषण रोखण्याच्या दृष्टीने मृत पशु उपयोगिता केंद्राचा राष्ट्रीय पशुधन अभियानाच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांमध्ये समावेश करण्याबाबत शासनाने कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (३१-०१-२०२३) :**(१) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तत्कालीन मा.मंत्री (पशुसंवर्धन) यांच्याकडे मागणी केलेली आहे.
(२) केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियानाच्या केंद्र शासनाकडून माहे जुलै, २०२१ मध्ये निर्गमित केलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचनांमध्ये मृत पशु उपयोगिता केंद्राची स्थापना करणे या योजनेचा समावेश करण्यात आलेला नाही.
(३) केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियान सन २०२१-२२ पासून संपूर्ण देशात राबविण्यात येत असून, या योजनेमध्ये संपूर्ण देशातील पशुसंवर्धन विभागातील गरजा विचारात घेवून विविध योजनांचा त्यामध्ये विचार करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कै.न्यायमूर्ती महादेव गोवींद रानडे चॅरिटेबल ट्रस्टची (पुणे) बनावट कागदपत्रे सादर करून शेवाळेवाडी येथील जागा बळकावल्याबाबत**

**(२२) ४६८६३ (०१-११-२०२२). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कै.न्यायमूर्ती महादेव गोवींद रानडे चॅरिटेबल ट्रस्टची (पुणे) बनावट कागदपत्रे सादर करून शेवाळेवाडी येथील १६ एकर जागा बळकावल्याचे दिनांक २० एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ट्रस्टची वेगळी नोंदणी नसून सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटीच्या अंतर्गत त्याचे काम चालते असे भासवून बनावट कागदपत्रे तहसीलदाराकडे सादर
केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०२-२०२३) :** (१), (२) व (३)
कै.न्यायमुर्ती महादेव गोविंद रानडे चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे व दि. सर्व्हेंटस् ऑफ इंडिया सोयायटी या दोन्ही संस्था स्वतंत्र नोंदणीकृत संस्था आहेत.
शेवाळेवाडी येथील प्रश्नाधिन जमीनीच्या कब्जेदार सदरी असलेल्या विश्वस्तांच्या निधनानंतर तहसिलदार हवेली यांचेकडे न्यायमुर्ती रानडे चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या दिनांक ०८/०२/२००७ व दिनांक २४/११/२००७ रोजीच्या पत्रांमधील विनंतीनुसार फेरफार क्र. ८७७ व ९०९ अन्वये ट्रस्टींच्या नावांमध्ये बदल करण्यात आले आहेत, ही वस्तुस्थिती आहे.
तद्नंतर माहे, मे २०२२ यादरम्यान जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयाकडे उक्त फेरफार रद्द करण्याबाबत अर्ज प्राप्त झालेला आहे. त्यास अनुसरून फेरफार क्र. ८७७ व ९०९ फेरतपासणीमध्ये घेण्याबाबत जिल्हाधिकारी पुणे यांच्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल (जि.रायगड) येथे प्रशासकीय इमारत उभारण्याबाबत**

**(२३) ४७११५ (२१-०९-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) येथील नवीन प्रशासकीय इमारतीचे काम निधी अभावी अपूर्ण अवस्थेत असल्याचे माहे जुन,

२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रशासकीय इमारतीचे काम जवळपास ५ वर्षापूर्वी ९० टक्के पूर्ण झाले असून उर्वरित १० टक्के इमारतीच्या कामाला निधी उपलब्ध होत नसल्यामुळे सदर इमारतीचे काम पूर्ण झाले नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उर्वरित १० टक्के कामाला निधी उपलब्ध न झाल्यास ९० टक्के पूर्ण झालेल्या प्रशासकीय इमारतीला खर्च केलेल्या कोरोडो रूपयाचे शासनाचे नुकसान होणार आहे, ही ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सर्व शासकीय कार्यालय एकाच छताखाली आणण्यासाठी उभारण्यात आलेल्या प्रशासकीय इमारतीचे काम पूर्ण करण्यासाठी उर्वरित निधी मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२१-०२-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) अंशत: हे खरे आहे.
पनवेल (ता. पनवेल, जि. रायगड ) येथील तहसिल कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामास आवश्यक असलेल्या वाढीव खर्चासाठी रुपये १७.८५ कोटी इतक्या रकमेस महसूल विभाग, शासन निर्णय, दिनांक ३१/०१/२०२३ अन्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

**राज्यात केंद्र सरकारच्या पंतप्रधान पीकविमा योजनेबाबत**

**(२४) ४७६४८ (१४-१२-२०२२). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र सरकारच्या पंतप्रधान पीकविमा योजनेत विमा कंपन्यांचा मोठया प्रमाणात फायदा होत असून गुजरात,मध्यप्रदेश ही राज्य या योजनेतून बाहेर पडली असल्याचे दिनांक ७ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेतून महाराष्ट्र शासनही बाहेर पडण्याच्या तयारीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे राज्य शासन या योजनेला कोणती पर्यायी योजना हाती घेणार आहे काय, तसेच या योजनेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०८-०२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
गुजरात हे राज्य प्रधानमंत्री पीक विमा योजनेतून बाहेर पडले असून महाराष्ट्र व मध्यप्रदेश मध्ये ही योजना कार्यान्वित आहे .
(२) हे खरे नाही
(३) खरीप २०२२ व रब्बी २०२२-२३ हंगामासाठी राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना Cup & Cap Model (८०:११०) नुसार अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी विमा क्षेत्र घटक (Area Approach) धरुन राबविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

**प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत बजाज अलायन्झ जनरल इन्शुरन्स कंपनीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची फसवणूक केल्याबाबत**

**(२५) ४७६९० (१४-१२-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत बजाज अलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनी यांच्याकडून जळगाव जिल्हयातील मुक्ताईनगरमधील शेतक-यांनी सन २०२०-२१ या कालावधीमध्ये या वर्षाचा प्रधानमंत्री पिक विमा (आंबिया बहार ) काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शेतक-यांनी प्रत्येक गटाचा विमा काढून गटाचे पैसे भरले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असे असतानाही दिनांक २७ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास झालेल्या प्रचंड चक्रिवादळामुळे केळीच्या बागेचे १०० टक्के नुकसान झालेल्यांना बजाज अलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनीने फक्त एकाच गटाची नुकसान भरपाई देऊन फसवणूक केल्याप्रकरणी तालुका कृषि अधिकारी सो, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मुक्ताईनगर, जि.जळगांव यांच्याकडे दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास तक्रार करुन कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी दिनांक १४ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास जिल्हा अधिक्षक अधिकारी कार्यालय, जळगांव यांनी तहसिलदार महसूल, लोकशाही दिन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव यांना कार्यवाही करण्याबाबतचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०८-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

दिनांक ११ नोव्हेंबर २०२१ रोजी तालुका कृषि अधिकारी, मुक्ताईनगर कार्यालयात केळी विमा धारक शेतकऱ्यांच्या तक्रारीं प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारींचे अनुषंगाने बजाज अलायन्झ जनरल इन्शुरन्स कंपनीमार्फत संबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(४) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, जळगाव यांनी दिनांक १५.०२.२०२२ च्या पत्रान्वये केळी पिक विमा काढलेल्या शेतकऱ्यांचा दाव्याची रक्कम व तपशिल तहसिलदार महसूल, लोकशाही दिन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव यांना सविनय सादर केला आहे.

(५) तक्रारदार शेतकऱ्यांनी केळी पिकासाठी प्रत्येकी दोन गटांचा विमा काढला असता बजाज अलायन्झ जनरल इन्शुरन्स कंपनीने प्रत्येकी केवळ एका गटाची विमा नुकसान भरपाई अदा केल्याचे दिसून आले. त्यानुषंगाने प्राप्त तक्रारीस अनुसरून दुसऱ्या गटांची विमा नुकसान भरपाई अदा करणेबाबतची कार्यवाही त्वरीत करण्याबाबतच्या सूचना विमा कंपनीस देण्यात आल्या होत्या. सदर सूचनांनूसार विमा कंपनीने दुसऱ्या गटांची देखील विमा नुकसान भरपाई संबंधित शेतकऱ्यांना अदा केली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणतांबा ( ता.राहाता, जि. अहमदनगर) येथे शेतकऱ्यांनी विविध मागण्यासाठी धरणे आंदोलन केल्याबाबत**

**(२६) ४७७१७ (१४-१२-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणतांबा ( ता.राहाता, जि. अहमदनगर) येथील शेतकऱ्यांनी त्यांच्या विविध मागण्या मान्य करण्यासंदर्भात माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान धरणे आंदोलने केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आंदोलनकर्त्या शेतक-यांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) तसेच शेतकऱ्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीत कोणते निर्णय घेण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०७-०२-२०२३) :** (१) होय.
(२) मौजे पुणतांबा, ता. राहाता. जि. अहमदनगर येथील शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांच्या विविध मागण्या जसे १) कृषिपंपाचे विजबील माफ करणे, २) गाळपाविना शेतात उभा असलेल्या ऊसाला अनुदान मिळणे, ३) उत्पादन खर्चापेक्षा कमी दरात विकलेल्या कांद्यास अनुदान मिळावे, ४) दुधाला ७०:३० या सुत्राप्रमाणे एफआरपी चे कवच मिळावे, ५) राज्य कृषि मुल्य आयोगाची स्थापना करुन एमएसपी कायद्याची अंमलबजावणी करावी, ६) महात्मा फुले कर्ज माफी योजनेतील रु.२ लाखापुढील पात्र शेतकऱ्यांची कर्जमाफी मिळावी, ७) कांदा, साखर, तांदुळ, गहु या शेतमालावरील निर्यातबंदी कायमची उठवावी, ८) सोलर कृषिपंपासाठी मागेल त्या शेतकऱ्याला अनुदान मिळावे, ९) सॅटेलाईटद्वारे पीकपाहणी यंत्रणा सुरु करावी, १०) विद्राव्य खतांना रासायनिक खतांप्रमाणे अनुदान मिळावे, ११) रासायनिक खते व औषधे यावर असलेला GST कर रद्द करावा, १२) पेरणी ते कापणीपर्यतची शेतीकामे ही मनरेगा योजनेंतर्गत समाविष्ट करावीत, १३) स्वर्गीय गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेतील पात्र शेतकऱ्यांना सहज लाभ मिळण्यासाठी प्रक्रिया सुलभ करावी, १४) पीकविमा करीता सहज सुलभ शेतकरी हिताचे मॉडेल तयार करावे, १५) शेतकरी आंदोलनातील आंदोलकांवर दाखल गुन्हे मागे घेणे अशा स्वरुपाच्या विविध मागण्या करण्यात आलेल्या आहेत.
(३) शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात श्री.अजितदादा पवार, तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री यांनी दि.७ जून, २०२२ रोजी बोलाविलेल्या बैठकीत शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात सविस्तर चर्चा झाली. बैठकीत घेण्यात आलेले निर्णय अंतिम करण्याच्या दृष्टीने बैठकीचे इतिवृत्त श्री.दादाजी भुसे, तत्कालीन मा.मंत्री (कृषि) यांचेमार्फत मा.उपमुख्यमंत्री यांना सादर करण्यात आले होते. तथापि, तद्नंतर सत्तांतरण झाल्यामुळे बैठकीचे इतिवृत्त अंतिम न होता नस्ती विभागास परत करण्यात आली आहे.
(४) सदर बैठकीचे इतिवृत्त अंतिम न झाल्यामुळे त्यावर कार्यवाही करता आली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सहकारी पतसंस्थासाठी ठेव विमा संरक्षण योजना राबविण्याबाबत

**(२७) ४७९२२ (१०-११-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १८ ते २० हजार सहकारी पतसंस्था, पतपेंढयामधे अंदाजे दिड लाखाहून अधिक कर्मचारी या संस्थांमध्ये कार्यरत असून सभासदांच्या हजारो कोटी रुपयांच्या ठेवी सुरक्षितपणे ठेवूनअतिशय उत्तम प्रकारे सेवा देण्याचे काम या पतसंस्थांच्या माध्यमातून सुरु असल्याचे माहे जून २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहकार कायदयामध्ये दुरुस्ती करुन नव्याने स्थापन केलेल्या नियामक मंडळातील जाचक नियम व अटी रदद करुन पतसंस्थासाठी ठेव विमा संरक्षण योजना राबविण्याची मागणी दिनांक १६ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य, सहकार आयुक्त पुणे यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार संस्थांना दिलासा देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२५-०१-२०२३) :** (१) होय.

राज्यात एकूण १९,९४८ सहकारी पतसंस्था कार्यरत असून त्यामध्ये दिड लाखाहून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. सध्यस्थितीत या पतसंस्थांमध्ये ३.१० कोटी ठेवीदारांच्या एकूण रु. ९०,५०१ कोटी इतक्या रक्कमेच्या ठेवी असून ४१,२६,००० कर्जदारांना रु. ६१,७९६ कोटींचे कर्जवाटप करण्यात आलेले आहे.

(२) मा. श्री. प्रकाश आबिटकर वि.स.स. यांनी सहकारी बँकांतील ठेव विमा संरक्षण योजनेच्या धर्तीवर पतसंस्थासाठी ठेव विमा संरक्षण योजना राबविण्याकरीता मा. मुख्यमंत्री महोदयांना दिनांक १८.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली होती.

(३) शासनाने राज्यातील नागरी/ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या कामकाजामध्ये गुणात्मक सुधारणा करण्यासाठी आणि त्यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी अधिनियमातील तरतूदीनुसार दिनांक ३१.१.२०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये नियमाक मंडळ गठीत केले आहे.

तसेच पतसंस्थांतील ठेवीदारांच्या ठेवींना संरक्षण देण्याकरीता अधिनियमातील तरतूदींनुसार दिनांक ११.९.२०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये स्थिरीकरण व तरलता निधी स्थापन करण्यात आला आहे. सदर निधीसाठी अंशदानाचा दर १० पैसे प्रति १०० रुपये ठेव असा आहे. मात्र अशा प्रकारे अंशदान देण्यास बऱ्याच पतसंस्थांनी तसेच पतसंस्था फेडरेशन ने विरोध केला असून अंशदानाची तरतूद रद्द करण्याची मागणी देखील केली आहे. त्यानुषंगाने संबंधीत घटकांशी चर्चा करुन सुयोग्य अंशदान लागू करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गेवराई (जि.बीड) तालुक्यातील महात्मा ज्योतीबा फुले कर्जमुक्ती योजनेस पात्र असलेल्या शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळाला नसल्याबाबत

**(२८) ४८३५७ (०६-१०-२०२२). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई, (जि.बीड) तालुक्यातील महात्मा ज्योतीबा फुले कर्जमुक्ती योजनेतील पात्र शेतक-यांना सेंट्रल बँक ऑफ इंडिया, सिरसमार्ग शाखेच्या अधिका-यांच्या हलगर्जीपणामुळे योजनेचा लाभ मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्जखात्याची विहित नमुन्यामध्ये माहिती अपलोड करण्याची सुविधा बंद झाल्यामुळे सदरील शेतक-यांची माहिती ही योजनेच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बँक शाखेने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांच्या कार्यालयात पात्र शेतकऱ्यांची यादी दिल्यानंतर जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने बँक शाखा अधिकाऱ्यांना पत्र पाठवून योजनेच्या अंतर्गत बँकेच्या १०० टक्के पात्र शेतक-यांना लाभ देण्याचे आदेश दिलेले असताना देखील बँकेचे अधिकारी व कर्मचारी यांनी कोणताही अहवाल वा खुलासा दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पात्र शेतकरी सभासदांना योजनेचा लाभ देण्यास कसुर करणा-या उक्त बँकेच्या दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली तसेच योजनेच्या लाभापासून वंचित असलेल्या शेतक-यांना योजनचा लाभ देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०६-०२-२०२३) :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

(४) व (५) सदर योजनेच्या संगणकीय प्रणालीवर संबंधीत शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांची माहिती अपलोड करण्याची सुविधा बँकेस उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

## तेरणा लि. ढोकी, तेरणानगर येथील शेतकरी सहकारी साखर कारखाना या मराठवाड्यातील साखर कारखान्यास पुनर्जीवित करण्याबाबत

**(२९) ४८४१९ (०६-१०-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. ढोकी, तेरणानगर या मराठवाड्यातील पहिल्या सहकारी साखर कारखान्यास पुनर्जीवित करण्यासाठी सर्व संबंधितांची बैठक घेण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १० मे,२०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेरणा कारखाना बंद असल्याने सन २०२१-२२ च्या गाळप हंगामात कारखान्याच्या कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात ऊस शिल्लक राहिला असल्याने पुढील हंगामात देखील विचार करुन कारखाना सुरु होणे अत्यावश्यक असल्यामुळे तेरणा बचाव संघर्ष समितीने माहे जून, २०२२ पर्यंत याबाबत निर्णय न झाल्यास सामुहिक आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनामार्फत दिलेल्या थकहमीबाबत अनेक वर्षे पाठपुरावा करुनही कोणतीच कार्यवाही न होणे, कारखान्यात झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करुन सक्तीची वसुली करण्याबाबत विनंती करुनी अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासन तसेच केंद्रीय गृह व सहकार मंत्री यांच्या सहकार्याने ३५००० सभासदांच्या मालकीचा सदर सहकारी साखर कारखाना सहकार क्षेत्रातच ठेवत, पुनर्जीवित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०७-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

तेरणा सहकारी साखर कारखाना लि. तेरणानगर हा कारखाना सुरू न झाल्यास आत्मदहन करणेबाबत मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे तेरणा बचाव संघर्ष समितीने दिनांक ०४/०५/२०२२ रोजी अर्ज सादर केला आहे.

(३) हे खरे नाही.

कारखान्यात झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,१९६० चे कलम ८३ अंतर्गत चौकशीसाठी प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड कार्यालयाने अनुक्रमे दिनांक ३/१०/२०११, दिनांक ४/६/२०१२ व दिनांक २१/६/२०१२ रोजी आदेश निर्गमित केले आहेत. तसेच कलम ८८ अंतर्गत चौकशीसाठी साखर आयुक्त कार्यालयाने दिनांक १५/१/२००३ रोजी व प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड कार्यालयाने अनुक्रमे दिनांक ३/१०/२०११, दिनांक ४/६/२०१२ व दिनांक १०/६/२०१६ रोजी आदेश निर्गमित केले आहेत. तथापि, पी. एफ. कार्यालयाने कारखान्याचे दप्तर जप्त केले असल्याने

चौकशीची कार्यवाही पूर्ण झालेली नाही.महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने विविध सहकारी साखर कारखान्याना दिलेल्या कर्जाच्या शासकीय थकहमीपोटी शासनाने बँकेस देय असलेली रक्कम निश्चित करणेबाबत श्री. राजगोपाल देवरा, प्रधान सचिव (वि.सु) वित्त विभाग मंत्रालय यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आलेली होती. सदर समितीमार्फत शासन थकहमी देय रक्कमांबाबत अंतरिम अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

(४) सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने कारखाना पुनर्जीवितकरणेबाबत कार्यवाही करता येत नाही.

(५) विलंब झाला नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवत (ता.दौंड, जि.पुणे) येथील मंडल अधिकारी यांनी अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहन चालकाकडून पैशाची मागणी केल्याबाबत**

**(३०) ४८५९१ (१४-१२-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवत (ता.दौंड, जि.पुणे) येथील मंडल अधिकारी यांनी अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहन चालकाकडून पैशाची मागणी दिनांक ३० मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास न्युज १८ लोकमत चॅनलवर व दिनांक ३१ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास सोशल मिडीयावर प्रसिध्द झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली असता, त्यामध्ये संबंधित मंडल अधिकारी दोषी आढळून आल्याने त्यांचे निलंबन करण्यात आले आहे व त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा नियमान्वये विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त चौकशीनुसार संबंधित अधिकाऱ्यांवर करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (३०-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी संबंधित मंडळ अधिकारी यांचेविरुध्दचा विभागीय चौकशीचा प्रस्ताव विहित कालावधीत तहसिलदार, दौड यानी जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे सादर केला नसल्याने सदर मंडळ अधिकारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु होऊ शकली नाही. याबाबत तहसिलादार, दौंड यांना दि.२०.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. तहसिलदार, दौंड यांनी नैसर्गिक आपत्ती प्रधानमंत्री किसान सन्मान योजना, भारत निवडणूक आयोगाकडील कामकाज, राज्य निवडणूक आयोगाकडील ग्राम पंचायत निवडणूक कामकाज इत्यादी विहित मुदतीत पूर्ण करुन घेणे अनिवार्य असल्याने तसेच अपूरा व अनअनुभवी कर्मचारी अभावी संबंधित मंडळ अधिकारी यांचा विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर् करण्यात विलंब झाल्याचे नमुद करुन दि.२७.१२.२०२२ रोजी सदरचा विभागीय चौकशीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केला आहे. प्रकरणी सदर मंडळ आधिकारी यांचेविरुध्द विभागीय चौकशीचे दोषारोपपत्र बजावून सदर विभागीय चौकशी दोन महिन्यांमध्ये पूर्ण करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**मौजे वारजे (ता.हवेली, जि. पुणे) येथील सर्वे नं. ८१ या इनाम जमिनीबाबत**

**(३१) ४८६५२ (०२-११-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वारजे (ता.हवेली जि.पुणे) येथील सर्व्हे नं. ८१ सदरची जमीन ही इनाम वर्ग ६ (पाटील वतन) असून सन २०१७ ते २०२२ या कालावधीपर्यत तहसीलदार हवेली कार्यालयामधून बांधकाम प्रकल्पांना निवासी व वाणिज्य प्रयोजनासाठी बिनशेती परवानगी (एन ए) सनद व आदेश देताना बाजारमूल्याचे नजराणा रक्कम ५० टक्के अधिमूल्य भरून घेतले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व त्यानुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०२-२०२३) :** (१) मौजे वारजे, ता. हवेली, जि.पुणे येथील स.नं. ८१/१/ब मधील क्षेत्र २४९.८० चौ.मी., स.नं. ८१/१/७ मधील क्षेत्र २३९.३३ चौ.मी., स.नं. ८१/१/१ मधील क्षेत्र २३९.३३ व स.नं.८१/१/१६ मधील क्षेत्र २३७.३४ चौ.मी. क्षेत्र अशा एकूण चार प्रकरणी तत्कालीन तहसिलदार, हवेली यांचेकडुन

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४२ नुसार अकृषिक आकारणी करणेत आलेली असून, सन १९४३/४४ पासूनचे ७/१२ उतारे व फेरफार पाहाता, प्रस्तुतची जमीन भोगवटादार वर्ग १ असल्याने अकृषिक आकारणी केलेली असून आकारणी करताना ५० टक्के नजराणा अधिमुल्य भरुन घेतलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे.
(२) होय.

सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, हवेली यांच्या चौकशी अहवालानुसार प्रस्तुतची मिळकत सन १९३० पासुनच्या ७/१२ वर भोगवटादार वर्ग-१ ची असल्याचे नमूद आहे, त्यामुळे सदर जमीन पाटील वतन असलेबाबत संदिग्धता दिसुन येत आहे. यासंदर्भात सर्व संबंधित विभागाकडील अभिलेखांची पुनश्च: तपासणी करुन सदर जमीन निर्विवादपणे पाटील वतन संवर्गातील असल्याचे आढळुन आल्यास संबंधित जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्याची तजवीज ठेवण्यात आलेली आहे. तथापि, शासनाचा महसूलाचे नुकसान होऊ नये म्हणून अकृषिक आकारणी केलेल्या धारकांकडुन ५० टक्के नजराणा रक्कम संबंधितांकडून वसूल करण्याची कार्यवाहीदेखील सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धारणी (जि.अमरावती) तालुक्यातील शासकीय जमिनीवर भुमाफियांनी अतिक्रमण केल्याबाबत

**(३२) ४८८३० (०१-११-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारणी (जि.अमरावती) तालुक्यातील शासकीय जमिनीवर मोठया प्रमाणात भुमाफीयांनी अतिक्रमण करुन शासनाची कोटयवधी रुपायांची जमीन बळकावली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,उक्त जिल्हयातील प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने शासनाचा कोटयवधी रुपयाचा महसुल बुडत आहे व महत्वाच्या ठिकाणी असलेल्या या जागा प्रशासन अतिक्रमणधारकांना देत असल्याचा आरोप येथील नागरिक करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनने या अतिक्रमणधारकांवर प्रतिबंधात्मक कारवाई करुन या जागा पुन्हा शासनाच्या ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-१२-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४)

सर्वे नंबर १२६,एकुण क्षेत्र १.२१ हे.आर जमिनीचा आगाऊ ताबा नगर पंचायत धारणीला दिलेला आहे. सदरहू जागेवर नमूना-८ चे अवलोकन केले असता जवळपास मागील ७-८ वर्षापूर्वी पासूनचे अतिक्रमण असून सदर अतिक्रमण हटविण्याबाबत नगर पंचायत धारणी यांचे कडून कार्यवाही सुरू आहे.

---

## मुळशी (जि.पुणे) तालुक्यात वळूमाता प्रक्षेत्र, ताथवडे, पशुसंवर्धन विभागाची जागा परत विभागास मिळण्याबाबत

**(३३) ४८९३६ (३०-१०-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळशी (जि.पुणे) तालुक्यातील वळूमाता प्रक्षेत्र, ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागाची जमीन परत करण्याबाबत महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास बैठकीत निर्णय होऊनही सदरील

जागा विभागास परत मिळालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेऊन उक्त जागा पशुसंवर्धन विभागास परत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०९-१२-२०२२) :** (१) व (२)

तत्कालीन मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १५/०२/२०२२ रोजी पार पडलेल्या बैठकीतील निर्देशानुसार पशुसंवर्धन विभाग व यशदा, पुणे या संस्थाना विषयांकित मौजे ताथवडे, ता. मुळशी येथील स. नं. २४ मधील जमिनीपैकी निश्चित किती जमिनीची आवश्यकता आहे, याबाबतचा अहवाल संबंधित यंत्रणांनी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे अद्याप सादर केलेला नाही. संबंधित यंत्रणांकडुन अहवाल प्राप्त होताच त्यानुषंगाने परिपूर्ण प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयामार्फत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## किल्लारी साखर कारखान्याची (ता.औसा जि.लातूर) आयोजित विशेष सर्वसाधारण सभा रद्द करण्याबाबत

**(३४) ४८९७८ (२०-०९-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. किल्लारी (ता.औसा जि.लातूर) येथील साखर कारखाना भाडे तत्वावर देण्याच्या व इतर विषयासंदर्भात दिनांक २५ जून,२०२२ रोजी वा त्यासुमारास कारखानाच्या जागेवर कारखान्याच्या शासन नियुक्त तात्पुरती व्यवस्थापन समितीचे आदेशावरून प्र, कार्यकारी संचालक, शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.किल्लारी ता.औसा यांनी आयोजित केलेली विशेष सर्वसाधारण सभा व त्याची वर्तमान पत्रात प्रसिद्ध केलेली नोटिस संस्थेच्या पोटनियमच्या अनुषंगाने नसल्याने व नियमबाह्य असल्याने सदरील सभा रद्द करण्यात यावी अशी मागणी कारखाना बचाव समीतीच्या व शेतकरी सभासदांच्या वतीने प्रभारी कार्यकारी संचालक,साखर कारखाना किल्लारी, सहनिबंधक तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर) नांदेड यांच्याकडे दिनांक २२ जून,२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व सदरील प्रकरणी दोषीवर नियमांनुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२७-१०-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) कारखान्याची विशेष सर्वसाधारण सभा नियमबाहय असल्याने सभा रद्य करणे ही बाब महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९१
नुसार सहकार न्यायालयाच्या अखत्यारितील असल्याने चौकशी करणेचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रोमोअर व इतर विविध योजनेंतर्गत झुडपी वने व राखीव वनक्षेत्रे यांच्या प्रस्तावासाठी स्वतंत्र एजन्सीची नेमणुक करण्याबाबत

**(३५) ४८९७९ (२५-०९-२०२२). अॅड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ग्रोमोअर व इतर विविध योजनांच्या अंतर्गत सन १९८० पूर्वी बऱ्याच शेतकऱ्यांना शेतजमिनीचे वाटप

करण्यात आलेले असून, झुडपी वने व राखीव वनक्षेत्रे यांचे प्रस्ताव तयार करण्यासाठी स्वतंत्र ऐजन्सीची नेमणुक करण्याबाबतची मागणी मा. लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन निर्णय क्र. एस - १०/२०१६/प्र.क्र. ४१३/फ–३ दिनांक २ डिसेंबर २०१६ अन्वये मा. जिल्हाधिकारी यांना अधिकार देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर प्रस्ताव तयार करणे महसूल व वन विभाग किंवा शेतकऱ्यांना शक्य नसल्यामुळे या संदर्भामध्ये स्वतंत्र एजन्सी जिल्हा नियोजन मंडळाकडून द्यावी व त्याचे देयके देखील जिल्हा नियोजन मंडळाकडून द्यावी अशा प्रकारची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी स्वतंत्र ऐजन्सी नेमणुकीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०१-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) शासनाच्या दिनांक २.१२.२०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये, सर्व जिल्हाधिकारी यांनी वन विभागाशी समन्वय राखून त्यांच्या अधिनस्त असलेल्या वनजमिनीपैकी महसूल विभागामार्फत यापूर्वी वाटप करण्यात आलेले क्षेत्र वगळून उर्वरीत क्षेत्रापैकी अतिक्रमण विरहीत क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात देण्याची कार्यवाही करण्याबाबत तसेच महसूल विभागाने विविध प्रयोजनासाठी पूर्वी वाटप केलेले वनक्षेत्र व अतिक्रमीत वनक्षेत्र नियमित करण्यासाठी त्याबाबतचा वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या कलम २ अंतर्गत वनक्षेत्र जर वनेत्तर कामासाठी वापरावयाचे झाल्यास त्यास केंद्र शासनाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. सदर प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही संबंधित यंत्रणांच्या (User Agency) माध्यमातून करणे अपेक्षित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यातही ‘मुख्यमंत्री किसान योजना’ सुरु करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतल्याबाबत

**(३६) ४९४९५ (१७-०१-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यातही ‘मुख्यमंत्री किसान योजना’ सुरु करण्याबाबतचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेनुसार पात्र शेतकऱ्यांना वर्षाकाठी रुपये सहा हजार अनुदान दिले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त योजनेची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०८-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उदभवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कलाक्षेत्रातील विविध समस्या सोडविण्यासंदर्भात शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत**

**(३७) ४९७०२ (१७-०१-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कलाक्षेत्रातील विविध समस्यांबाबत ज्येष्ठ दिग्दर्शक (श्री.जब्बार पटेल) व चित्रपट अभिनेत्री यांनी सांस्कृतिक कार्य मंत्री, महाराष्ट्र राज्य यांची मुंबईतील सहयाद्री अतिथीगृह येथे भेट घेऊन दिनांक १८ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास चर्चा केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भेटीत कलाक्षेत्रातील या दिग्गज कलाकारांनी मा.मंत्री महोदयासमोर मांडलेल्या समस्यांवर योग्य रितीने कार्यवाही करण्यासंदर्भात संबंधित शासकीय अधिकाऱ्याना त्याचवेळी मा.मंत्री महोदयांनी आदेशित केले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कलावंतानी विशद केलेल्या कलाक्षेत्रातील विविध समस्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे, तसेच उक्त समस्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-०२-२०२३) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

श्री.जब्बार पटेल, अध्यक्ष, पुणे फिल्म फाऊंडेशन यांनी दिनांक १६.०९.२०२२ च्या निवेदनान्वये मा.मंत्री, सांस्कृतिक कार्य यांना पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी रु.४ कोटी मंजूर निधी वितरीत करण्याची विनंती केली आहे. त्याअनुषंगाने दिनांक २१.११.२०२२ व दि १८.१.२०२३ च्या शासन निर्णयान्वये अनुक्रमे रु.१,८७,४०,०००/- व रु.१,०४,४४,०००/-मिळून रु.२,९१,८४,०००/- इतका निधी पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी वितरीत केला आहे.

(३) व (४) उपरोक्त निवेदनात वरील विषयाव्यतिरिक्त कलाक्षेत्रातील समस्यांबाबत कोणताही उल्लेख नसल्याने त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदूर्ग व अमरावती जिल्ह्यातील महात्मा ज्योतिराव फुले योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत**

**(३८) ५०१४९ (१८-०१-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी महात्मा ज्योतिराव फुले योजनेंतर्गत दोन लाखांवरील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत शासनाकडे सन २०१५ ते २०१९ या कालावधीत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य करण्यात न आल्याने जिल्हाधिकारी कार्यालयावर किसान मोर्चा काढण्याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी यांना लेखी निवेदनाव्दारे दिनांक १७ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच अमरावती जिल्ह्यात दोन लाखांपेक्षा जास्त कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना अद्याप या योजनेमार्फत कर्जमाफी झाली नसून अशा थकीत कर्जदार शेतकऱ्यांच्या नावे बॅंक ऑफ महाराष्ट्रासह इतर बॅंकांनी कोर्ट कार्यवाहीच्या नोटीस पाठविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात ज्या शेतकऱ्यांनी दोन लाखांच्यावर कर्ज घेतले त्या शेतकऱ्यांचे सुध्दा दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्याचे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांच्या मागणीच्या अनुषंगाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही तसेच कर्जदार शेतकऱ्यांचे थकीत कर्ज माफ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१५-०२-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) बॅंकांनी कर्जवसूलीसाठी शेतकऱ्यांना न्यायालयीन
कार्यवाहीच्या नोटीसा पाठविल्याचे निवेदन अथवा तक्रार जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अमरावती कार्यालयास प्राप्त झालेले नाही.
(४) व (५) सद्यस्थितीत रु. २ लाखापेक्षा जास्त पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा प्रस्ताव विचाराधिन नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कातनेश्वर (ता.पुर्णा, जि.परभणी) येथे महसूल मंडळातील पर्जन्यमापक यंत्र मागील सहा वर्षापासून बंद अवस्थेत असल्याबाबत**

**(३९) ५०१६७ (१८-०१-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कातनेश्वर (ता.पूर्णा, जि.परभणी) येथे महसूल मंडळातील पर्जन्यमापक यंत्र मागील सहा वर्षापासून बंद अवस्थेत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील काही वर्षांपासून ओला व कोरडा दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असतानाही महसूल विभाग, कृषी विभाग व शेतकऱ्यांमधील महत्त्वाचा दुवा असलेले पर्जन्यमापक यंत्र बंद अवस्थेत असून त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार यासंदर्भात दुर्लक्ष करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच कातनेश्वर महसूल मंडळातील पर्जन्यमापक यंत्र दुरुस्त करुन सुरु करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०८-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) , (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर येथील दापचरी दुग्ध प्रकल्पात झालेला आर्थिक गैरव्यवहार व अनियमिततेची चौकशी करण्याबाबत**

**(४०) ५०२८० (२४-०१-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील दापचरी येथील दुग्ध प्रकल्पाच्या सन २०१० ते २०२१ या कालावधीत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून १८ कोटी रुपये खर्च करून सुमारे ४५ लाख रुपयाचा आर्थिक गैरव्यवहार झाल्यामुळे त्याची अचूक चौकशी करण्यासाठी दिनांक २१ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये दुग्ध प्रकल्पाचे आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान समिती गठित करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दुग्ध प्रकल्पात अधिकाऱ्यांनी केलेल्या आर्थिक गैरव्यवहार व अनियमिततेची सदोष चौकशी पूर्ण करून एका महिन्यात समितीने सदर अहवाल शासनाला सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त चौकशी समितीने सदर अहवाल शासनास सादर केला असल्यास अहवालाचे निष्कर्ष काय आहेत त्यानुसार संबंधित दोषी आढळून आलेल्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती प्रशासकीय वा दंडात्मक कारवाई केली वा

करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?
**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०२-२०२३) :** (१) होय,
सदर प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.२१.२.२०२२ रोजीच्या आदेशान्वये आयुक्त, दुग्धव्यवसाय यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.
(२), (३) व (४)
सदर तक्रारीतील बहुतांश मुद्दे हे तांत्रिक स्वरूपाचे असल्याने अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोकण भवन यांच्याकडुन अहवाल मागविण्यात आला आहे. सदर अहवाल प्राप्त होताच त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

## कळमेश्वर (जि. नागपूर) येथील तहसिल कार्यालयाच्या इमारतीमध्ये खरेदीच्या प्रस्तावास मंजूरी मिळेण्याबाबत

**(४१) ५०८४५ (२५-०१-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळमेश्वर (जि.नागपूर) येथील तहसिल कार्यालयाच्या इमारतीमध्ये नवीन अत्याधुनिक फर्निचर खरेदी करण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी नागपूर यांनी प्रधान सचिव, महसूल मंत्रालय यांच्याकडे पाठविलेला असताना अदयापही निधीसह मंजूरी मिळाली नसल्याचे माहे नोव्हेबंर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने सदर प्रस्तावास निधीसह मंजूरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) कळमेश्वर, जि. नागपूर येथे तहसिल कार्यालयाच्या इमारतीमध्ये फर्निचर कामाकरीता रुपये १३९.६३ लक्ष इतक्या रकमेचा प्रस्ताव शासन स्तरावर प्राप्त असून प्रस्तावाची छाननी सुरु असून कामाची निकड व निधीची उपलब्धता विचारात घेऊन प्रशासकीय मान्यतेनंतर निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील सुखना नदीपात्रातील धारेगाव येथील वाळुपट्टायाबाबत

**(४२) ५१२१९ (२७-०१-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील सुखना नदीपात्रातील धारेगाव येथील वाळुपट्टा कंत्राटदार सलीम पटेल यांना दिलेला असुन त्यांनी २३३४ ब्रास जास्तीचे उत्खनन केल्याबाबत उपविभागीय अधिकारी यांनी सात कोटी वीस हजार रूपयाच्या दंडाची नोटीस दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१६-०२-२०२३) :** (१) होय हे खरे आहे
(२) व (३)
मौजे धारेगाव ता. पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील सुखना नदीपात्रातील वाळूघाटधारक यांनी २३३४ ब्रास

वाळुचे अवैध उत्खनन करून अटी व शर्तीचा भंग केलेला असल्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम ४८ (७) व (८) नुसार रू.०७,००,२०,०००/- इतक्या रकमेचे दंडाचे आदेश पारित करण्यात आलेले आहेत. तसेच, भारतीय दंड संहिता १८६० कलम ३७९ इ. खाण व खनिज (विकास व नियमन) कायदा १९५७ चे कलम २१ नुसार पोलिस स्टेशन पाचोरा (FIR क्र.३८२/२०२२) येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

---

**राज्यात केंद्र पुरस्कृत प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे संगणकीकरण करण्याबाबत**

**(४३) ५१३४३ (१९-०१-२०२३). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्र पुरस्कृत प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे संगणीकरण या नव्या योजनेची अंमलबजावणी करण्यात मंत्री मंडळाने माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नव्या योजनेंतर्गत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना संलग्न असलेल्या कृषी पतपुरवठा सहकारी संस्थाचे संगणकीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०२-०२-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाने निश्चित केलेल्या मार्गदर्शक सुचनेच्या निकषात बसणाऱ्या प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे संगणकीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(२) केंद्र पुरस्कृत प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे संगणकीकरण या योजनेस शासन निर्णय दिनांक ०७/१०/२०२२ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत सन २०२२-२३ ते सन २०२४-२५ या ३ वर्षाच्या कालावधीत प्रत्येक वर्षी ४,००० अशा एकूण १२,००० प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे संगणकीकरण करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोट (जि.अकोला) तालुक्यात एका खदान मालकाने पोलिस स्टेशनमध्ये**
**जमा असलेल्या वाहनावर अवैध उत्खनन केल्याबाबत**

**(४४) ५१५६७ (२९-०१-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :**सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोट (जि.अकोला) तालुक्यात एका खदान मालकाने पोलिस स्टेशनमध्ये जमा असलेल्या वाहनाने चार ते पाच वेळा अवैध उत्खनन केल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणात केलेल्या चौकशीमध्ये महसुल विभागातील अधिकाऱ्यांनी उत्खनन करण्यास खदान मालकाला परवानगी दिली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शासनाचा कोटयावधी रुपयांचा महसूल बुडविणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१६-०२-२०२३) :**(१),(२),(३) व (४) दिनांक २२.०६.२०२२ रोजी वाहन क्र. MH-

४८-J-०१२१ चा संबंधित खाणपट्टा धारकाने मौजे गापीपूर, ता. अकोट, जि.अकोला येथील गट नं.४२/२, ४२/३ येथील खाणपट्ट्याचे गौण खनिजाच्या वाहतुकीसाठी Mahakhanij या प्रणाली मार्फत सकाळी ०९.१६ ते ११.१६ या कालावधीकरीता eTP क्र.५१२१७६९ तयार करण्यात आला. वाहतुकी दरम्यान त्याच वाहनावर दुसऱ्या खाणपट्टाधारकाने (गट क्र. ४०/२) सकाळी ०९.४४ वाजता दुसरा eTP क्र.५१२२५६२ महाखनिज प्रणाली तयार करण्यात आला. सदर दुसरा eTP हा प्रथम eTP चा कालावधी संपन्या अगोदर तयार करण्यात आल्याने प्रथम तयार करण्यात आलेल्या eTP चा आपोआप कालावधी संपुष्टात आला. दरम्यान उपविभागीय अधिकारी, अकोट यांनी सदरचे वाहन वाहतुक करीत असतांना वाहतुक पासची तपासणी केली असता गौण खनिजाच्या eTP ची वैधता संपुष्टात आल्याचे निदर्शनास आले असल्या कारणाने उपविभागीय अधिकारी, अकोट यांनी सदर वाहन जप्त करून अकोट पोलिस स्टेशन येथे दिनांक १२.०६.२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता लावण्यात आले. जप्त केलेल्या वाहनाबाबत पहिला eTP कालावधी संपुष्टात येऊन व वाहन पोलिस स्टेशन येथे सुरक्षेमध्ये असतांना देखील सदर वाहनाकरीता eTP तयार केल्यामुळे संबंधित वाहनमालक व खाणपट्टा धारक यांचा खुलासा मागविण्यात आला तथापि त्याचा खुलासा तर्कसंगत नसल्याने संबंधितावर कडक कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, अकोला यांना कळविण्यात आले आहे.

---

## महागाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील क्रशर चालकांकडून अटी व शर्तींचे उल्लंघन होत असल्याबाबत

**(४५) ५१५७० (२९-०१-२०२३). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील कासोळा, श्रिफुली, वदड या ठिकाणी खनिकर्म विभागाने घातलेल्या अटी व शर्तींचे क्रशर चालकांकडून उल्लंघन करण्यात येत असल्याचे माहे नोव्हेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नियमांची पायमल्ली करणाऱ्या क्रशर चालकावर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१६-०२-२०२३) :** (१), (२) व (३) महागाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील कासोळा, श्रिफुली, वदड या ठिकाणी खनिकर्म विभागाने घातलेल्या अटी व शर्तीची क्रशर चालकांकडून पायमल्ली होत असल्याची बातमी दिव्य मराठी या वृत्तपत्रात बातमी प्रकाशीत झाली असून त्यानुषंगाने तहसिलदार, महागांव यांनी दिनांक ०२.१२.२०२२ अन्वये महागाव तालुक्यातील कासोळा, शिरफुली, वडद मु. या क्रशर ठिकाणांची तांत्रिक मोजणी करण्याबाबत सुचना दिल्या आहेत. तांत्रिक मोजणीचा अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

## भोर, वेल्हे व मुळशी (जि.पुणे) येथे भात शेतीसाठी महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत दगडबांध व ताल बांधण्यास मान्यता देण्याबाबत

**(४६) ५२३८१ (२३-०१-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर, वेल्हे व मुळशी (जि.पुणे) येथे भात शेती मोठ्या प्रमाणात ओढ्याच्या काठालगत असल्याने अतिवृष्टीमुळे सातत्याने बांधाचे व शेतीचे नुकसान होऊन भात खाचरांमध्ये पाणी साचून न राहिल्यामुळे उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणात घट होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागातील भात शेतीसाठी दगडबांध व ताल बांधण्यास महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मंजुरी मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास रोजगार हमी योजना मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने भात शेतीसाठी महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत दगडबांध व ताल बांधण्याबाबत मान्यता देण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२२-०२-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अनुज्ञेय कामांच्या यादीमध्ये दगडबांध व ताल बांधण्याच्या कामाचा समावेश असल्याने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ही कामे करण्यासाठी शासनस्तरावरुन मान्यता घेण्याची आवश्यकता नाही. विहित पद्धतीने ही कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत करता येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**फुलसावंगी (जि.यवतमाळ) येथील पैनगंगा नदीच्या पात्रातील वाळूचे अवैध उत्खनन होत असल्याबाबत**

**(४७) ५३२१४ (२९-०१-२०२३). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) फुलसावंगी (जि.यवतमाळ) येथील पैनगंगा नदीच्या पात्रातील वाळू चांगल्या दर्जाची असल्याने महागांव, पुसद, उमरखेड येथून मोठया प्रमाणात मागणी असल्याने या ठिकाणी अवैध वाळू उत्खनन होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१६-०२-२०२३) :**(१),(२) व (३) हे खरे नाही
यवतमाळ जिल्ह्यातील लिलाव न झालेल्या रेती घाटातून रेतीची चोरी होऊ नये म्हणून तहसीलस्तरावर नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी व तलाठी यांची संयुक्त पथके तयार करण्यात आली आहेत.
महागाव येथील तहसील स्तरावर गठीत करण्यात आलेल्या दक्षता पथकाव्दारे दिनांक २७.०९.२०२२ रोजी पैनगंगा नदीपात्रात/हिंगणी बंधाऱ्याजवळ रेतीची अवैध वाहतूक करणाऱ्या ५ वाहनावर कारवाई करून दंडात्मक आदेश पारित केला. सदर प्रकरणात रू.०६,६५,३६५/- दंड वसूल करून शासन जमा करण्यात आला आहे.

---

**धरणगाव (जि.जळगाव) तालुक्यातील वेल्हाळे-खंडळो मार्गे कुऱ्हा (पानाचे) या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी गौण खनिजाची अवैध वाहतूक होत असल्याबाबत**

**(४८) ५३९२५ (२९-०१-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धरणगाव (जि.जळगाव) तालुक्यातील वेल्हाळे खंडाळे मार्गे कुऱ्हा (पानाचे) या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी परवानगी न घेता तसेच अनामत रक्कम न भरता कंत्राटदार गौण खनिजाची वाहतूक करीत असल्याचे दिनांक २४ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बेकायदेशीर वाहतूकीमुळे शासनाचा लाखो रुपयाचा महसूल बुडविला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१६-०२-२०२३) :**(१), (२), (३) व (४) हे खरे नाही

दिनांक १९.१०.२०२२ रोजी सकाळ या वृत्तपत्रातील रस्त्याच्या दुरूस्तीसाठी अवैध गौण खनिज वाहतूक या बातमीच्या अनुषंगाने चौकशी केली असता वेल्होळे-खंडाळे मार्गावर व कुऱ्हे गावठाण गट नं.९०४ ते ५३६ पर्यंत रस्त्यात खड्डे बुजविण्याचे व दुरूस्तीचे काम करण्यात आले असून त्यामध्ये खडी मिश्रित डांबर वितळून काम केलेले आहे. तसेच रस्त्यातील खड्डे बुजविणे व दुरूस्तीसाठी इतर कुठल्याही प्रकारचे गौण खनिज वापरण्यात आलेले नाही.

जळगाव जिल्हयात अवैध गौण खनिज प्रकरणात माहे एप्रिल २०२२ ते माहे नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत ३४५ वाहनावर कारवाई करून रू.१.८५ कोटी दंडाची रक्कम वसूल करून शासन जमा केलेली आहे. तसेच १६ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे.

---

## वरप व कांबा(ता.कल्याण,जि.ठाणे) येथे आदिवासींच्या जमिनीवर भूमाफियांनी बेकायदेशीर घरे बांधल्याबाबत

**(४९) ५५१२७ (१८-०१-२०२३). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील वरप व कांबा या ग्रामीण भागात आदिवासींच्या जमिनीवर भूमाफियांनी बेकायदेशीर घरे बांधण्याचे काम सुरु केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी यांनी या कामाला स्थगिती देऊन देखील आदिवासींना धमकावून सदर कामे सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास , शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करुन बांधकामे पूर्ण केली जात आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास , उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भूमाफियांवर कोणती कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०८-०२-२०२३) : (**१), (२), (३), (४) व (५) मौजे वरप, ता. कल्याण, जि. ठाणे या गावी आदिवासी व्यक्तीचे नावे जमीन असल्याचे गाव अभिलेखात दिसून येत नाही.

मौजे कांबा, ता. कल्याण, जि. ठाणे येथील स. नं. १७/पै. व १२७ पै. या जमिनी महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ अन्वये अतिरिक्त घोषीत करून आदीवासी व बिगर आदिवासी व्यक्तींना तालुका हुकुमाने शेती प्रयोजनार्थ वाटप करण्यात आल्या होत्या. सदर जमिनीवर चाळीचे बांधकाम करुन शर्तभंग केल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे उपविभागीय अधिकारी, ठाणे यांनी दिनांक १७.०४.२०१३ रोजीच्या आदेशान्वये स. नं. १२७/पै. मधील एकूण १३ भूखंड व दिनांक १०.०९.२०१४ रोजीच्या आदेशान्वये स. नं. १७/पै. मधील एकूण २१ भूखंड शासन जमा करण्यात आले आहेत.

तसेच मौजे कांबा, ता. कल्याण जि. ठाणे येथील स. नं. ४४/५, ४९, ५३/१, ५३/३ व ५३/७ या आदिवासी मालकीच्या मिळकतीवर अनधिकृतपणे चाळीचे बांधकाम, म्हशीचे तबेल्याचे, फार्म हाऊसचे, गोडावूनचे बांधकाम केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी प्रकरण परत्वे चौकशी करुन संबंधितांना सुनावणीची संधी देऊन व आदिवासी खातेदाराच्या जमिनीवर केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये नियमोचित कार्यवाही करण्याबाबत तहसिलदार, कल्याण यांना दिनाक १६.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्राधिकृत करण्यात आले आहे.

---

## मुस्लिम कायद्यांतर्गत अनोंदणीकृत असलेल्या हिबा (Oral Gift) हिबानामाद्वारे मालमत्तांच्या हस्तांतरणाबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे पालन होत नसल्याबाबत

**(५०) ५५६८२ (२९-०१-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुस्लिम कायद्यांतर्गत अनोंदणीकृत असलेल्या हिबा (Oral Gift) हिबानामाद्वारे मालमत्तांच्या हस्तांतरणाबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे पालन होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कायद्यातर्गत शासन निर्णय २०१९ पासून प्रलंबित असून अदयापपर्यंत नस्तीवर स्वाक्षरी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्यात अनोंदणीकृत हिबा (Oral Gift ) हिबानामाद्वारे हस्तांतरणाबाबत केलेल्या मिळकतीचे फेरफार तलाठी अधिकारी करीत नाहीत, हे ही खरे आहे काय,

४)असल्यास, याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२७-०२-२०२३) :** (१), (२) ,(३), (४) व (५)

"मुस्लीम व्यक्तींगत कायद्यातंर्गत हिबा नामाची नोंद होणेबाबत" या विषयाच्या अनुषंगाने या कार्यासनातील नस्ती क्र.संकीर्ण २०१८/प्र.क्र.२४/ज-१अ अन्वये शासन स्तरावर कार्यवाही सुरू असून, सदर नस्ती सादरीकरणात आहे. तसेच विषयानुंषगाने लोकप्रतिनिधींच्या निवेदनांवर शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.